MHWS100004482023

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | १७.०३.२०२३. | | |
| नोंदणी तारीख | : | १७.०३.२०२३. | | |
| निकाल तारीख | : | ०७.०५.२०२६. | | |
| कालावधी | : | **वर्षे** | **महिने** | **दिवस** |
| | | ०३ | १ | २१ |

# सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मालेगांव, तालुका मालेगांव, जिल्हा वाशिम यांचे न्यायालयात

**( पीठासीन अधिकारी : अ. सु. कोष्टी )**

**नियमित दिवाणी दावा क्र. १८/२०२३.**
**निशाणी क्र. ३७**

१. गोविंदा हरी कांबळे,
वय: ५५ वर्ष, व्यवसाय: शेती

२. नारायण हरी कांबळे,
वय: ६५ वर्ष, व्यवसाय: शेती

३. पंढरी हरी कांबळे,
वय: ६० वर्ष, व्यवसाय: शेती
सर्व राहणार- जांभरूनवाडी, मालेगांव, जि. वाशिम. } **...वादीं**

**...विरूध्द...**

१. कुंडलीक खंडु माने,
वय: ७० वर्ष, व्यवसाय: शेती

२. सोपान रत्नाजी मोरे,
वय: ६५ वर्ष, व्यवसाय: शेती
दोघे राहणार- पांगरी नवघरे, ता. मालेगांव, जि. वाशिम.

३. पवन भगवानदास काबरा,
वय: ३० वर्ष, व्यवसाय: शेती
राहणार- काबरा एजन्सीच्या मागे लाखाळा वाशिम. } **...प्रतिवादीं**

**<u>दावा ताब्याकरीता व नुकसान भरपाई करीता</u>.**

**वादीतर्फे विधिज्ञ श्री. के.एन.साळुंके.**

**प्रस्तुत दावा प्रतिवादी क्र.२ व ३ विरूध्द एकतर्फा.**

**प्रतिवादी क्र.१ तर्फे स्वतः प्रतिवादी क्र.१.**

## न्यायनिर्णय

### ( आज दिनांक ०७.०५.२०२६ ई. रोजी घोषीत )

वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळणे करीता व नुकसान भरपाई करीता दाखल केलेला आहे. दाखल केलेला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन,**

०२. **अ.** मौजे जांभरूनवाडी, ता. मालेगांव, जि. वाशिम येथील गट नंबर ६७ मधील क्षेत्रफळ ३ हे ५४ आर, हिस्सा ० हे ८७ आर, आकार रू.१,३८ पैसे पोट खराब ०.०२०० आर जमीनीच्या चतुःर्सिमा पुर्वेस–खडकी ते जांभरूनवाडी शिव, पश्चिमेला– सरकारी रस्ता, उत्तरेला– प्रतिवादी क्र.१ कुंडलीक हरीभाऊ माने, प्रतिवादी क्र.२ सोपान मोरे व प्रतिवादी क्र.३ पवन काबरा यांची शेती आणि दक्षिणेला–शिव रस्ता या चतुःर्सिमेच्या आतील ० हे ८७ आर व पोट खराब ०.०२०० आर एकुण ० हे ८७.०२०० आर जमीनीपैकी प्रतिवादी क्र.१, २ व ३ यांनी वादीची ० हे २४ आर गट नंबर ६६ मधील शेत जमीन ही दाव्याचा विषय असुन (यांस येथुन पुढे '**दावा मिळकत**' असे संबोधण्यात येईल.)

**वादीची केस थोडक्यात खालीलप्रमाणे,**

०३. दावा मिळकत ही वादीची एकत्र कुटंबांतील मिळकत असुन प्रतिवादींचा दावा मिळकतीत कोणताही हक्क अधिकार व हितसंबंध नाही. प्रतिवादी क्र. १ कुंडलीक यांची वादीच्या शेताला लागुन उत्तर बाजुला गट नंबर ६६ मध्ये १ हे ७० आर आणि प्रतिवादी क्र. २ सोपान मोरे ह्यांची व प्रतिवादी क्र. ३ पवन काबरा यांची सुध्दा वादीच्या शेताला लागुन उत्तर बाजुला गट नंबर ६६ मध्ये १ हे २१ आर शेत जमीन आहे. दिनांक २३/४/२०२१ रोजी प्रतिवादी क्र. १, २, ३ यांनी संगनमत करून वादीची दावा मिळकत असलेली ० हे २४ आर एवढी शेत जमीन अतिक्रमण करून ताब्यात घेतली त्यावेळी वादीने प्रतिवादींना *तुम्ही आमच्या दावा मिळकत असलेल्या शेत जमीनीवर अतिक्रमण का केले* असे विचारले असता प्रतिवादींनी वादीला *तुम्ही सरकारी मोजनी टाका, तेंव्हाच आम्ही दावा मिळकत तुम्हांला परत देवु* असे म्हटले. त्यावरून वादीने केलेल्या मोजणी अर्जावरून दिनांक २३/३/२०२२ रोजी

गट नंबर ६७ उप–अधिक्षक तालुका भुमी अभिलेख कार्यालय, मालेगाव मोजनी करून मौजे जांभरूनवाडी येथील गट नंबर ६७ ची हद्द कायम करून साक्षीदार यांच्यासमक्ष मो.र.क्र. १३०५/२०२२ तयार केला. सदर मोजनी मध्ये इंग्रजी अक्षराप्रमाणे ए, बी, सी, डी, ई, अक्षराने दर्शविलेले क्षेत्र गट नंबर ६७ चे असुन मोजनी वेळी गट नंबर ६६ चे धारकाच्या वहिवाटीत ०.२४ आर क्षेत्र आढळून आल्याचे नकाशामध्ये नमुद केलेले आहे.

०४. त्यानंतर दिनांक २३/०३/२०२२ रोजी दावा मिळकतीची मोजनी केल्यानंतर अतिक्रमण केलेले ०.२४ आर शेज जमीन प्रतिवादींनी वादीला द्यावी अशी वेळोवेळी वादीने विनंती केली असता प्रतिवादींनी ताब्यात देण्यास कसुर केला. तसेच दि.०८.०२.२०२३ रोजी वादीने प्रतिवादींना ० हे २४ आर जमीन ताब्यात द्यावी अशी मागणी केली असता प्रतिवादींनी वादीला *ते सदर दावा मिळकत शेत जमीन ही वादीला परत देणार नाहीत काय करावयाचे ते करून घ्यावे* अशी धमकी दिली. प्रतिवादी दावा मिळकतीचा लाभ घेत असल्यामुळे वादीला दावा मिळकतीच्या उत्पन्नापासुन वंचीत राहावे लागत असल्यामुळे वादीने दावा दाखल तारखेपासुन नुकसान भरपाई मिळणेकामी व अतिक्रमणीत जमीनीचा ताबा मिळणे करीता सदरचा दावा दाखल केला आहे.

०५. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना दाव्याचे समन्स प्राप्त होवुन देखील ते हजर न झाल्याने त्यांच्याविरूद्ध दावा एकतर्फा चालविण्यात आला आहे.

०६. प्रतिवादी क्र. १ यांनी वादीने दाखल केलेल्या दाव्यास त्यांची काही हरकत व म्हणणे नसल्याचे व हाच त्यांचा लेखी जबाब समजण्यात यावा व दावा त्यांच्याविरूध्द चालविणे नाही करीता निशाणी क्र. ८ वर पुर्सिस दाखल केली.

०७. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

०८. दाव्यातील कथनांवरुन मुद्दे व त्यांचे निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

| **क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीं हे सिध्द करतात काय की, ते दावामिळकतीचे ताबेदार असल्याचे व त्यांचे मिळकतीवर प्रतिवादींनी २४ आर अतिक्रमण केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| २. | वादीं हे सिध्द करतात काय की, ते नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय ? | **नकारार्थी** |
| ३. | काय आदेश व हुकुमनामा ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०९. प्रस्तुत कामी वादीने त्यांच्या दाव्यातील कथनांना बळकटी देण्यासाठी स्वतःच साक्षीदार क्र.१ म्हणून पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.१०) तसेच मोजणीदार म्हणुन साक्षीदार क्र.२ संतोष काशिराम काजणे यांची साक्ष नि.क्र.२३ वर नोंदविली आहे. वादी यांनी त्यांच्या पुराव्याची बाजु पुर्सिस नि.क्र.३१ अन्वये बंद केली.

| अ.क्र. | कागदोपत्री पुरावा | निशाणी |
|---|---|---|
| १. | गट क्र.६७ चा सातबारा उतारा | ११ |
| १. | उप अधिक्षक भुमि अभिलेख, कार्यालय यांचा आदेश | २४ |
| २. | नोटीस | २५ व २६ |
| ३. | पंचनामा | २७ |
| ४. | बँकेचे चलन | २८ |
| ५. | अ-प्रत | २९ |
| ६. | ब-प्रत | ३० |
| ७. | गट क्र.६६ चा सातबारा उतारा | ३५ |
| ८. | नमुना आठ-अ | ३६ |

**<u>मुद्दा क्रमांक ०१ व ०२</u> :-**

१०. वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरिता ते एकत्रात चर्चिले आहेत.

११. वादीने त्याच्या नि.क्र.१० वरील सरतपासात दाव्यातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. निशाण ११ वरील सातबारा उता-याचे अवलोकन केले असता दावा मिळकतीचे एकुण क्षेत्र ३ हेक्टर ५४ आर असल्याचे दिसते. तसेच दावा मिळकत वादीचे कब्जेवहिवाटीत असल्याचे देखील दिसते. तसेच त्याअनुषंगाने दाखल केलेला सरतपास देखील विनाआव्हानीत राहिलेला आहे.

१२. तथाकथीत अतिक्रमण सिध्द करणेकामी वादीने प्रस्तुत प्रकरणी वादीने मोजणीदार म्हणुन साक्षीदार क्र.२ संतोष काशिराम काजणे यांची नि.क्र.२३ वर साक्ष नोंदविली. त्यांनी त्यांच्या सरतपासात मो.र.क्र.१३०५/२०२२ चा मुळरेकॉर्ड ओळखु शकत असल्याचे, वादीने मौजे जांभरुणवाडी येथील गट क्र.६७ मोजणीकरीता केलेल्या अर्जावरून कार्यालयाने

त्यांच्या नांवे आदेश नि.क्र.२४ पारीत करून गट मोजणी करीता मुळ रेकॉर्ड सोबत वादीने केलेला मोजणी अर्ज, सातबारा व इतर रेकॉर्ड त्यामध्ये कार्यालयीन आदेश, नोटीस, गटाचा नकाशा व टिपण उतारा ईत्यादी कागदपत्रे त्यांना दिल्याचे, सदर आदेशवर त्यांचे नांव असुन उप अधिक्षक भुमि अभिलेख, मालेगांव यांची सही असल्याचे व ती सही ते त्यांचे वरिष्ठ असल्यामुळे ओळखत असल्याचे, उप अधिक्षक भुमि अभिलेख यांनी सहधारक, लगतधारक आणि अर्जदार यांना दिलेल्या नोटीसा नि.क्र.२५ व २६ वरून लगतधारक हजर झाल्याचे, दिनांक २३.०३.२०२२ रोजी ते मोजणीकरीता गेल्याचे, मोजणीच्या वेळी वादी, लगतधारक व पंच लक्ष्मण मारोती पांडे, विष्णु तुळशिराम माने, प्रशांत गोविंदा कांबळे, भिमराव नामदवे कांबळे, समाधान नारायण कांबळे, संतोष गुलाब नांदे व ज्ञानेश्वर सोपान मोर हे हजर असल्याचे, अर्जदार, सहधारक व लगतधारक यांनी दाखविल्याप्रमाणे वहिवाटीची मोजणी इटीएस मशीननुसार वहिवाटीप्रमाणे मोजणी करून उपलब्ध रेकॉर्डच्या सहाय्याने हद्दीच्या खुणा समजावुन दिल्याचे, चुना टाकुन चुन्याची मार्किंग केल्याचे, मोजणी पुर्ण झाल्यानंतर त्यांनी अर्जदार, लगतधारक व सहधारक यांच्यासमक्ष जबाब/पंचनामा नि.क्र.२७ केल्याचे, त्यावर त्यांची, अर्जदार, सहधारक, लगतधारक व पंचाची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे, मोजणीसाठी अर्जदाराने बँकेत चलन नि.क्र.२८ भरून मोजणीची फीस अदा केल्याचे, मोजणी नंतर त्यांनी अ–प्रत नि.क्र.२९ तयार करून त्यावर मोजणी करूणार म्हणुन त्यांची, शिरस्तेदार व छानणी लिपीक यांची सही असल्याचे, सदर कर्मचारी हे त्यांच्या कार्यालयातील असल्यामुळे त्यांची सही ओळखत असल्याचे, तसेच त्यांनी अ–प्रत वरून ब आणि क–प्रत तयार करून क–प्रत न्यायालयात अहवाल दाखल करतेवेळी अहवालसोबत दाखल केल्याचे आणि ब–प्रत नि.क्र.३० ही मोजणी प्रकरणात सोबत ठेवण्यात आल्याचे, मोजणीमध्ये गट क्र.६७ चे २४ आर क्षेत्र कमी आढळुन आल्याचे व ती जागा गट क्र.६६ च्या धारकाच्या ताब्यात असल्याचे नमुद केल्याचे, नकाशात त्याला ए, बी, सी, डी, ई अक्षराने दर्शविलेले क्षेत्र हे गट क्र.६७ चे असुन ते मोजणीवेळी गट क्र.६६ च्या धारकाच्या ताब्यात असल्याचे आढळुन आल्याचे कथन केलेले आहे. अभिलेखावरील निशाण ३५ वरील सातबारा उता–याचे अवलोकन केले असता गट क्र.६६ चे धारक हे प्रतिवादी क्र.१ ते ३ असल्याचे दिसते. प्रतिवादींना पुरेसी संधी असतांना देखील सदर साक्षीदाराची साक्ष ही विनाआव्हानीत राहिलेली आहे व तथाकथीत अतिक्रमणासंदर्भातील कथने ही शाबीत झालेली आहेत.

१३. सबब, अभिलेखावरील दाखल पुराव्यांचे, मोजणी अहवालाचे, शक्यतांच्या

आधारावर अवलोकन केले असता वादीचे दावा मिळकतीवर प्रतिवादी यांनी निशाणी २९ व ३० वरील मोजणी नकाशात नमूद केल्याप्रमाणे दावा मिळकत गट क्र. ६७ चे मिळकतीवर प्रतिवादी यांनी २४ आर क्षेत्राचे अतिक्रमण केल्याचे सिध्द केलेले आहे. सबब, वादी मागणीस अतिक्रमित जागेचा कब्जा मिळणेस पात्र राहतो. वादीने त्याचे नुकसान झाले संदर्भात कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. सबब, त्या मागणीस वादी पात्र राहत नाहीत. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ०३ :–**

१४. उपरोक्त चर्चेनुसार मी मुद्दा क्र.३ चे अनुषंगाने खालील आदेश पारित करतो–

**आदेश**

१. वादींचा दावा **अंशतः** मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादी क्र.१ ते ३ यांच्या दावा मिळकत गट क्र.६७ वर २४ आर क्षेत्राचे अतिक्रमण नि.क्र. २९ व ३० च्या नकाशा नुसार सिध्द झाल्याने वादी क्र.१ ते ३ हे सदर अतिक्रमित २४ आर क्षेत्राचा ताबा मिळण्यास पात्र राहतात.

४. सदर नि.क्र. २९ व ३० वरील नकाशा हुकूमनाम्याचा भाग राहिल.

५. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर अतिक्रमित क्षेत्राचा ताबा या आदेशाच्या दिनांकापासून ३ (तीन) महिन्यांच्या आत वादीस सुपूर्द करावा.

६. जर प्रतिवादी क्र. १ याने वरील मुदतीत ताबा दिला नाही, तर वादी हा न्यायालयामार्फत सदर ताबा मिळविण्यास पात्र राहील.

७. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

८. येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायलयात घोषित करण्यात आला.)

AMIT SUNIL KOSHTI

Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2026.05.07 17:31:04 +0530

स्थळ : मालेगांव. **(अ. सु. कोष्टी)**

दिनांक : ०७.०५.२०२६. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मालेगांव.

जिल्हा वाशिम.

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| I affirm that, contents of this PDF file is same word to word, as per original Judgment **:-** | | |
| 1. Name of the Stenographer | :- | **Shivam B. Patange (L.G.)** |
| 2. Court Name | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon |
| 3. Judgment dated | :- | 07.05.2026 |
| 3. Judgment Signed by the P.O. | :- | 07.05.2026 |
| 4. Judgment uploaded on | :- | 07.05.2026 |